# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परिपत्रक क्र.: ३३७/२०२१

**"दी प्रेसिडेंट ऑफ इंडिया डॉ. शंकर दयाळ शर्मा गोल्ड मेडल २०२१—२२"**
**( मानवविज्ञान विद्याशाखेकरीता)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे देण्यात येणाऱ्या **"दी प्रेसिडेंट ऑफ इंडिया डॉ. शंकर दयाळ शर्मा गोल्ड मेडल"** पारितोषिकासाठी खाली दिलेल्या निकषानुसार सन २०२१—२०२२ या शैक्षणिक वर्षामध्ये **मानवविज्ञान विद्याशाखेतील** विशेष गुणवत्ता प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांची शिफारस करण्यात यावी. सदर पारितोषिक पदवी परीक्षेच्या शैक्षणिक गुणवत्तेनुसार देण्यात येईल.

शिफारस करतांना एकाच विद्यार्थ्यांची माहिती खालीलप्रमाणे पाठवावी. शैक्षणिक गुणवत्ता, अभ्यासेतर उपक्रमातील गुणवत्ता, विशेष सामाजिक कार्य व इतर क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्य यांचा उल्लेख असावा व आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती सोबत जोडाव्यात. (फोटोसह)

| १) विद्यार्थ्याचे नाव | परीक्षा | उत्तीर्ण वर्ष | श्रेणी/गुण |
|---|---|---|---|
| | मानवविज्ञान विद्याशाखा | २०२१ | |

२) महाविद्यालयामधील अध्यापन काळातील वर्तणूकीबाबत अहवाल/दाखला.
   अ) नियमितपणा   ब) महाविद्यालयातील प्राध्यापकांशी असणारी वर्तणूक.

३) इतर कार्ये :   अ) खेळ
   ब) महाविद्यालयातील इतर सामाजिक कार्यातील सहभाग.

४) सामाजिक कार्ये :   एन.एस.एस., इत्यादी

५) खालील गोष्टींबाबत मा. प्राचार्य यांनी प्रत्येक बाबीसाठी २५ पैकी गुण द्यावयाचे आहेत.

   १) अभ्यासक   २) वर्तणूक   ३) इतर कार्य   ४) सामाजिक कार्य

**"दी प्रेसिडेंट ऑफ इंडिया डॉ. शंकर दयाळ शर्मा गोल्ड मेडल"** साठी विद्यार्थ्यांची वर उल्लेख केलेल्या माहिती व शिफारशीसह **दि. १०/१२/२०२१** पूर्वी शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे प्रत्यक्ष (हस्तपोच) सादर करावी. तद्नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७.   )
संदर्भ क्र. शै.प्रवेश/४३०८   )
दिनांक : २६/११/२०२१   )

उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग